फोन नं. (02164) 272414,
8275706613
Web : http://gcekarad.ac.in
Email: principal@gcekarad.ac.in,

महाराष्ट्र शासन

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड

विद्यानगर, कराड पिन - 415124 जि. सातारा

जा.क्रं.शाअमक/शिष्यवृत्ती/२०२५/ 2446          दिनांक :- 1 AUG 2025

## सूचना अत्यंत महत्वाची

### -: शिष्यवृत्ती संबधीत माहिती :-

- शिष्यवृत्तीचे सर्व फॉर्म महाडीबीटी (**https://mahadbt.maharashtra.gov.in**) या संकेतस्थळावर भरले जातात. विद्यार्थ्यांनी सतत महाडीबीटी संकेतस्थळावर तसेच महाविद्यालयाचे संकेतस्थळ वेळोवळी पाहणे आवश्यक आहे. कारण शिष्यवृत्ती बाबतच्या सर्व सूचना संकेतस्थळावरती उपलब्ध असतात.
- विद्यार्थ्यांनी महाडीबीटी संकेतस्थळावर अर्ज / फॉर्म भरल्यानंतर त्या अर्जाची महाडीबीटी यांचेकडून पडताळणी करून साधारणत: त्या आर्थिक वर्षातील मार्च महिन्या पासून रक्कम विद्यार्थी व संस्थेच्या खाती मंजूर करणारे कार्यालय त्यांचेकडे शिल्लक असलेल्या अनुदानानुसार जमा करण्यात येतात.
- शिष्यवृत्ती व फ्रिशीप या योजनामध्ये येणारे सर्व प्रवर्ग :- SC, ST, VJNT (All), OBC, SBC इत्यादी येतात.

महाडीबीटी या संकेत स्थळावर SC, ST, VJNT (All), OBC, SBC या प्रकारच्या शिष्यवृत्ती व फ्रिशीपचे अर्ज विद्यार्थ्यांनी Online भरावयाचे असतात. तसेच जे विद्यार्थी संस्थेच्या अथवा समाज कल्याण विभाग यांचे वसतीगृहात राहतात अशा विद्यार्थ्यांनी Maintance Allowance मिळणेबाबतचा Online फॉर्म भरावयाचा असतो,तदनंतर सदर विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होतो.

विद्यार्थ्यांनी वरील योजनांचा लाभ घेण्यासाठी विहीत मर्यादेत Online फॉर्म भरणे आवश्यक असते. महाडीबीटी संकेतस्थळावर फॉर्म भरलेनंतर विद्यार्थ्यांनी सातत्याने स्वत:चे लॉगीन पाहणे बंधनकारक आहे. कारण फॉर्म पडताळणी करताना जर अर्जामध्ये तृटी / अपुर्णता असल्यास सदरचा अर्ज विद्यार्थ्यांच्या लॉगीन मध्ये परत पाठविण्यात येतो. व तृटींची पुर्तता करून विद्यार्थ्यांनी विहीत मुदतीत आपला अर्ज महाविद्यालयास Online पध्दतीने Submit करणे बंधनकारक आहे. तसे न केल्यास अर्ज ना मंजूर होतो. व त्यामुळे विद्यार्थ्यांस खुल्या प्रवर्गाप्रमाणे फी भरावी लागते. याची नोंद विद्यार्थ्यांनी व पालकांनी घ्यावी.

टिप.-

१. Open प्रवर्गातील विद्यार्थी जर Against Cap प्रवेशीत असल्यास पुर्ण प्रवेश फी भरणे बंधन कारक राहील. तसेच कोणत्याही सवलतीचा लाभ घेता येणार नाही.

२. Category प्रवर्गातील विद्यार्थी जर Against Cap प्रवेशीत असल्यास Income Certificate नुसार सवलतीचा लाभ आपल्या Category च्या उत्पन्न मर्यादेनुसार देय राहील व त्यानुसार प्रवेश फी भरणे बंधन कारक राहील.

३. M.Tech अभ्यासक्रमास प्रवेशीत विद्यार्थी (Gate Qualify झालेले असतील तर अशा विद्यार्थ्यांना AICTE द्वारे ) Stipend घेत असलेल्या विद्यार्थ्यांना महाडीबीटी संकेतस्थळावर अर्ज करता येणार नाही. व त्याचा लाभ घेता येणार नाही.

## Director of Technical Education मार्फत देण्यात येणा-या योजना खालील प्रामाणे. (MAHB DBT) मार्फत अर्ज करणे बंधनकारक आहे.

| अ.क्र. | प्रवर्ग/स्कीमचे नाव | माहितीचा तपशील |
|---|---|---|
| १ | राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना (ईबीसी) | Open मधील विद्यार्थ्यांना या सवलतीचा लाभ दिला जातो. त्यानंतर ( त्यामध्ये मुलांना Tuition Fee, Exam. Fee यामध्ये ५० टक्के सवलत देण्यात आलेली आहे. व मुलींना Tuition Fee, Exam. Fee यामध्ये १०० टक्के सवलत देण्यात आलेली आहे.) यामध्ये EWS व SEBC मधील विद्यार्थ्यांचा समावेश आहे. |
| २ | डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना (DTE) | यामध्ये जे विद्यार्थी वसतीगृहात राहतात किंवा वसतीगृह न मिळाल्यास बाहेर Rent ने राहतात तसेच ज्यांचे पालक अल्पभूधारक आहेत तसेच ज्याच्याकडे मजूर कार्ड आहे व ज्यांचे उत्पन्न ८ लाखापेक्षा कमी आहे अशा विद्यार्थ्यांना या सवलतीचा फायदा होतो.व ज्यांच्याकडे अल्पभूधारक व मजूरकार्ड नाही तसेच ज्यांचे उत्पन्न १ लाखापेक्षा कमी आहे. अशा विद्यार्थ्यांना याचा लाभ घेता येतो. ( भूमिहीन असलेल्या विद्यार्थ्यांना याचा लाभ देता येत नाही.) |
| ३ | Minority Scholarship | जे विद्यार्थी बौध्द, ख्रिश्चन, पारशी, मुस्लीम, जैन या प्रवर्गामध्ये येतात अशा विद्यार्थ्यांना Minority (Open प्रवर्गाची संपूर्ण फी भरून) या सवलतीचा फायदा दिला जातो. |

समाज कल्याण विभाग (MAHB DBT) मार्फत देण्यात येणा-या योजना खालील प्रामाणे.

| अ.क्र. | प्रवर्ग/स्कीमचे नाव | माहितीचा तपशील |
|---|---|---|
| १ | SC Scholarship | ज्या पालकांचे मागील आर्थिक वर्षाचे वार्षीक उत्पन्न २.५ लाखापेक्षा कमी आहे. ( सदरचा उत्पन्नाचा दाखला सक्षम प्राधिकारी यांचा असने आवश्यक आहे.) अशा विद्यार्थ्यांना ही सवलत दिली जाते. |
| २ | SC Free ship | ज्या पालकांचे मागील आर्थिक वर्षाचे वार्षीक उत्पन्न २.५ लाखापेक्षा जास्त असून याकरीता (उत्पन्न मर्यादा नाही ) अशा विद्यार्थ्यांना ही सवलत दिली जाते. |
| ३ | SC Maintance Allowance | या प्रवर्गामधील जे विद्यार्थी वसतीगृहात राहत आहेत अशांना ही सवलत दिली जाते.( त्यांनी फॉर्म भरताना कॅप आयडी, वसतीगृह शुल्क भरलेली पावती व वसतीगृहाचा राहत असलेबाबतचा दाखला असणे फॉर्म भरताना बंधनकारक आहे. |
| ४ | SC Disability | जे विद्यार्थी अपंग आहेत अशा विद्यार्थ्यांकडून पुर्ण फी भरून घेऊन त्यांचे SC प्रवर्गाच्या Disability प्रवर्गातून फॉर्म भरून त्यांना शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात येतो.<br>( Disability ४०% व त्यापेक्षा जास्त) |

| अ.क्र. | प्रवर्ग/स्कीमचे नाव | माहितीचा तपशील |
|---|---|---|
| ५ | ST Scholarship | या प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या ज्या पालकांचे मागील आर्थिक वर्षाचे वार्षीक उत्पन्न २.५ लाखापेक्षा कमी आहे. अशा विद्यार्थ्यांना ही सवलत दिली जाते. सदरची सवलत ही<br>( मा. प्रकल्पधिकारी, एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प या विभागाकडून मंजूर केली जाते.) |
| ६ | ST Free ship | या प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या ज्या पालकांचे मागील आर्थिक वर्षाचे वार्षीक उत्पन्न २.५ लाखापेक्षा जास्त असून याकरीता (उत्पन्न मर्यादा नाही ) अशा विद्यार्थ्यांना ही सवलत दिली जाते.<br>( मा. प्रकल्पधिकारी, एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प या विभागाकडून मंजूर केली जाते.) |

| | | |
|---|---|---|
| ७ | ST Maintance Allowance | या प्रवर्गामधील जे विद्यार्थी वसतीगृहात राहत आहेत अशांना ही सवलत दिली जाते. ( त्यांनी फॉर्म भरताना कॅप आयडी, वसतीगृह शुल्क भरलेली पावती व वसतीगृहाचा राहत नसेल व भाडयाने राहत असेज तर त्या चालू वर्षाचा भाडेकरार जोडणे फॉर्म भरताना बंधनकारक आहे. |
| ८ | VJNT (All), OBC, SBC Scholarship | या प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या ज्या पालकांचे मागील आर्थिक वर्षाचे वार्षीक उत्पन्न १.५ लाखापेक्षा कमी आहे. ( सदरचा उत्पनांचा दाखला सक्षम प्राधिकारी यांचा असने आवश्यक आहे.) अशा विद्यार्थ्यांना ही सवलत दिली जाते. |
| ९ | VJNT (All), OBC, SBC Free ship | या प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या ज्या पालकांचे मागील आर्थिक वर्षाचे वार्षीक उत्पन्न १.५ लाखापेक्षा जास्त आहे. ( त्या विद्यार्थ्यांनी नॉन क्रिमीलीअर दाखला सक्षम प्राधिकारी यांचा असने आवश्यक आहे.) अशा विद्यार्थ्यांना ही सवलत दिली जाते. |
| १० | VJNT (All), SBC Maintance Allowance | या प्रवर्गातील जे विद्यार्थी व्यवसायीक शिक्षण घेत असून ते वसतीगृहात राहत असतील तर त्यांना ही सवलत घेता येते. तसेच विद्यार्थ्यांने वसतीगृह मिळणेबाबतचा अर्ज केलेला असेल तर त्याने वसतीगृह मिळाले नसेल तर तो बाहेर राहत असल्यास त्याचे वसतीगृहाचे ना हरकत प्रमाण प्रत्र जोडणे आवश्यक आहे. |

प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड

प्रत.- १. सर्व सूचना फलकांवर लावणेसाठी.
२. संस्थेच्या संकेतस्थळावरती अपलोड करण्यासाठी.